जानेवारी २००३

# मा. सहकार आयुक्तांनी पुर्नविचार करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, सेन्ट्रल बिल्डींग,पुणे – ४११००१ यांनी दि. १६/०९/२००२ पासून राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थाच्या संदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयांचे व आदेशांचे पुनर्वालोकन करुन त्यात बदल करणे आवश्यक आहे. अन्यथा सर्व सामान्य कार्यकर्त्यांनी उभी केलेली ही पतसंस्थांची सहकार चळवळ अडचणीत येण्याच्या मार्गाकडे जाईल.

सहकारातील काही बँका व पतसंस्थांमध्ये अडचणी / अडथळे दृष्टीक्षेपात आल्यानंतर व काही प्रकरणात सर्वसामान्य ठेवीदार हवालदिल झाल्यामुळे ही संपूर्ण शासकीय व्यवस्था एकाएकी प्रचंड अंतीम वेगाने कार्यरत झाल्याचे दिसते.आणि त्यावर केवळ एकमेव रामबाण उपाय कागदोपत्री तयार करुन त्याची अंमलबजावणी नैसर्गिक न्यायाचा अधार न घेता त्वरीत चालू करणे हे सुध्दा पुर्णपणे अव्यावहारीक आहे.

नियंत्रण ठेवणे व प्रत्यक्ष त्यासाठी दिलेल्या कार्यक्रमाची अमलबजावणी होणे, यात प्रचंड तफावत आहे,हेच समजून घेणे आवश्यक आहे. नागरी सहकारी पतसंस्थांचे लेखापरिक्षण करुन त्यांना द्यावयाचे वर्ग ठरविण्याचे निष्कर्ष सर्व व्यापक आहेत व सहकार चळवळीस पोषक आहेत, यामध्ये दुमत असल्याचे कारण नाही. परंतू त्याची अंमलबजावणी येत्या तीन महिन्यांनी संपणाऱ्या ३१ मार्च २००३ पासून लेखापरिक्षण करणाऱ्या संस्थांना लागू होणार आहे.व त्यामुळे जवळजवळ सर्वच नागरी सहकारी पतसंस्थांना त्या लेखापरिक्षण वर्ग ठरविण्याच्या निष्कर्षामध्ये उतरविण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागणार आहे. कारण थकबाकीचे प्रमाण ५ टक्के च्या खाली आणणे,ठेवीवर जास्तीत जास्त १३ टक्के व्याज देणे, आणि सभासंदाना द्यावयाच्या कर्जावर जास्तीत जास्त १६ टक्के व्याजदर आकारणे, कर्ज व ठेवीचे प्रमाण ६०ते ७० टक्के च्या प्रमाणातच ठेवणे तरळता जिदंगी साठी रक्कम ठेवणे ही बाब एकाएकी ताबडतोब येणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये केवळ तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये कृतीत आणणे संपूर्णपणे असंभव आहे. एवढेच नाहीतर राज्यातील मुंबईसह सर्व नागरी सहकारी पतसंस्थांना या शासकीय निर्णयाची प्रत्यक्ष अधिकृतपणे माहिती देण्यासाठी एक टक्का सुध्दा सहकार खात्यामार्फत प्रयत्न झाल्याचे बिलकुल दिसत नाही. या शिवाय नागरी सहकारी पतसंस्थाच्या कारभारच आढावा दर तीन महिन्यांनी सहकार खात्यामार्फत घेऊन ही ''एम.आय.एस''पध्दत सक्तीची करुन वर्ग देण्याचा जो निर्णय मा. सहकार आयुक्तांनी घेतलेला आहे, हा आश्चर्यजनक आहे. एवढेच नव्हे तर,ज्या संस्था गेले अनेक वर्षापासून मा. सहकार आयुक्तांच्या संपूर्णपणे नियंत्रणाखाली व त्यांनीच नेमलेल्या लेखा परिक्षकांच्या कार्यक्षेत्रात असतात, २००१–२००२ ह्या आर्थिक वर्षापर्यंत ज्या नागरी सहकारी पतसंस्थांना लेखा परिक्षण करुन 'अ' वर्ग प्राप्त होता होता, त्यांना 'क'वर्गीकरण करण्यात आलेले आहे. मुंबईसहीत राज्यातील सर्व पतसंस्थांना ही बाब ज्यावेळेस १०० टक्के समजेल, त्यावेळेस फार मोठे प्रश्न उभे राहणार आहेत.शासकिय लेख परिक्षणाच्या 'अ'वर्गाऐवजी किंवा 'ब' वर्गाऐवजी ज्यावेळेस 'क'आणि 'ड'वर्ग मिळतील, व त्यांची सभासदांना, ठेवीदारांना व परिसरातील जनतेस ज्यावेळेस माहिती होईल,त्यावेळी अनावश्यक

व अज्ञानपोटी उभी राहिलेल्या भितीने ठेवी कमी होण्याकडे व त्याचा अंतीम परिणाम कर्जवसुलीवर व थकबाकी वाढण्यासाठी होईल व त्यामुळे नागरी सहकारी पतसंस्था व त्या संस्था चालविणारे कार्यकर्ते, कर्मचारी,ठेवीदार अडचणीत येणार आहेत. आणि या संपुर्ण एकूण परिस्थितीचा राज्यातील संपुर्ण अर्थव्यवस्थेवर विपरीत दुरगामी परिणाम होणार आहे.

एखाद्या निर्णयाने राज्यातील जनता किंवा समाज हा कुठल्याही अर्थाने लाभार्थी होणे आवश्यक आहे.शिवाय सहकार चळवळीचा हेतू व्यापक प्रमाणात उद्घोषीत होण्याच्या प्रकियेतील असावयास पाहिजे.पंरतू चांगले निर्णय किंवा आदेश घेवून चालत नाहीत तर त्याची अंमलबजावणी केव्हांपासून,कोणापासून, व काशासाठी करतो ह्यावरच त्याची यशस्वीता अवलंबून असते हे समजणे आवश्यक आहे.

मा. सहकारी आयुक्तांनी, नागरी सहकारी पतसंस्थांना स्थिरस्थावर, भरभक्कम पायावर व स्वावलंबी बनविण्यासाठी भागधारक व ठेवीदांराची रक्कम १००टक्के सुरक्षित ठेवण्यासाठी जो विचार व कल्पना मांडली आहे ती स्वागतार्ह आहेच. परंतु त्याची अंमलबजावणी त्वरित ३१ मार्च २००३ रोजी संपण्याचा सन २००२-२००३ पासून लेखापरिक्षण करण्यात येणाऱ्या संस्थाना लागू केल्याने चांगला विचार संपूर्ण अर्थव्यवस्थेला अडचणीत आणु शकेल, अशी एंकदरित परिस्थिती दिसते. शिवाय दर तीन महिन्यांनी नागरी सहकारी पतसंस्थांना भयभीत अवस्थेमध्ये आणल्याचे जाणवते. त्यासाठी मा. सहकार आयुक्तांनी या सर्व निर्णयाची अंमलबजावणी २००२-२००३ सालापासुन न करता २००७ -२००८ सालापासुन करण्यासाठी आपल्या यापुर्वीच्या आदेशामध्ये बदल करणे आवश्यक आहे, व केवळ कालावधीमध्येही बदल करुन चालणार नाही तर, सर्व नागरी सहकारी पतसंस्थांचे नियमितपणे लेखापरिक्षण केले जाईल,पतसंस्थामधील केवळ कर्मचारी नव्हे तर सर्व संचालकही १०० टक्के प्रशिक्षीत कसे होतील, याची काटेकोरपणे योजना आखुन कार्यक्रमाची अंमलबजावणी करावयास पाहिजे.

नागरी सहकारी पतसंस्थांच्या नवीन आदर्श उपविधी संदर्भात सुध्दा असेच घडलेले आहे.२८फेब्रुवारी २००३पर्यंत पतसंस्थांनी हे सुधारीत पोटनियम स्विकारण्याची अंतिम मुदत आहे, असे वर्तमानपत्रात वाचण्यात आले व असे उपविधी अजूनही मा. सहकारी आयुक्तांनी कुठेही उपलब्ध करुन दिलेले नाहीत. व संस्थांना तसे कळविलेही नाही. अत्यंत हातघाई करुन चांगल्या कल्पना व निर्णय, उपलब्ध यंत्रणेची कार्यक्षमता, तत्परता,प्रामाणिकपणा व आर्थिक बाबीचा विचार न करता हे सर्व निर्णय केल्याचेच दिसते.

म्हणून मा. सहकारी आयुक्तांनी नागरी पतसंस्थाच्या संदर्भात कर्ज व ठेवीवरील व्याजदर, थकबाकीचे प्रमाण, ठेवी व कर्जवाटपाचे प्रमाण, आर्दश उपविधी, एम.आय..एस.(मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टिम),तरलता जिंदगी इत्यादी बाबींच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी सन २००२-२००३ पासून चालू न करता सन २००७-२००८ पासून लागू करावेत व मुंबईसह संपुर्ण राज्यात हे बदल जनहितार्थ घेतले आहेत. व त्या पतसंस्था जतन करण्याची जबाबदारी सुध्दा सरकारची आहे, हे सिध्द करावयास पाहिजे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**